# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. २५-२२** **दिनांक २८/०१/२०२२**

**सराईत गुन्हेगांराना अटक करुन ३ घरफोडी व ३ चोरीचे गुन्हे उघडकीस करुन एकुण ०२,९०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यास वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेस यश.**

वालीव पोलीस ठाणे हद्दीमध्ये रात्री घरफोडी व चोरीचे प्रमाण वाढत असल्याने घरफोडी व चोरी करणारे आरोपीत यांचा घटनास्थळावरुन मिळालेल्या तांत्रिक गोष्टींचा अभ्यास करुन तसेच गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे गुन्हयांचा तपास करुन रेकॉर्डवरील तसेच इतर आरोपीत क्रमांक १) राजनारायण ऊर्फ लंगडा छोटेलाल त्रिपाठी रा. गावराईपाडा, वसई पु. २) कृष्णकांत ऊर्फ मोनु त्रिजुगिनारायण त्रिपाठी रा. गावराईपाडा, वसई पु. ३) गोपाल ऊर्फ छोटु भगत विश्वकर्मा रा. गावराईपाडा, वसई पु. ४) रविंद्रकुमार सुंदरलाल शर्मा रा. लखनौ, उत्तर प्रदेश ५) कृष्णकांत अपिसर राय रा. भोयदापाडा, वसई पुर्व व ६) सद्दाफ नुर आलम शेख रा. नवजीवन वसई पुर्व यांना अटक करुन वालीव पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटिकरण शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीत यांना विश्वासात घेऊन कौशल्याने तपास केला असता त्यांनी वालीव पोलीस ठाण्याचे खालील गुन्हयातील आरोपीतांकडुन सोन्याचे दागिने, मोबाईल हॅन्डसेट, रोख रक्कम, ॲल्युमिनियम तवा, ड्रिल मशीन ब्रास व रिक्षा असा एकुण ०२,९०,०००/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन खालील गुन्हे उघडकिस करण्यात यश आले आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नंबर व कलम |
|---|---|---|
| १ | वालीव | गु.रजि.नं I १३५९/२०२१ भादंविसं कलम ४५४,४५७,३८० |
| २ | वालीव | गु.रजि.नं I १४२१/२०२१ भादंविस कलम ४५४,४५७,३८० |
| ३ | वालीव | गु.रजि.नं I ३६/२०२२ भादंविस कलम ४५४,४५७,३८० |
| ४ | वालीव | गु.रजि.नं I १४०५/२०२१ भादंविस कलम ३७९,३४ |
| ५ | वालीव | गु.रजि.नं I १५०९/२०२१ भादंविस कलम ३७९ |
| ६ | वालीव | गु.रजि.नं I ३३/२०२२ भादंविस कलम ३७९ |

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, श्री. राहुलकुमार पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पो.उप.निरी. गजानन जिंकलवाड, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, पोना. सचिन दोरकर, किरण म्हात्रे, राजेंद्र फड, गोरख सानप, सतिष गांगुर्डे पो.अंम. गजानन गरीबे सूर्यकांत मुंढे, सचिन खताळ, जयवंत खंडवी, दिनेश पाटील यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

---ooo---